प्रतिलिपी

1. पुलगावं कॉटन मिल लि. पुलगावं, ता. देवळी, जि. वर्धा यांना आदेश व अनुमोदीत अभिन्यास नकाशासह अग्रेषित.
2. उपविभागीय अधिकारी, **वर्धा** यांना मूळ प्रकरण आदेश व अनुमोदीत नकाश्यासह अग्रेषित.
3. तहसिलदार **देवळी** यांना आदेश व अनुमोदीत नकाशासह अग्रेषित. त्यांनी तालुका नमुना-2 मध्ये नोंद घेऊन भूधारकाला विहित नमुन्यातील सनद द्यावी.तसेच सबंधीत तलाठयास सुचना देऊन आदेशात नमुद केल्यानुसार अकृषक कर व इतर उपकराची वसुली नियमानुसार करावी.
4. तलाठी **गुंजखेडा** तहसिल **देवळी** मार्फत राजस्व निरिक्षक **देवळी** यांनि
   - गांव नमुना-2 मध्ये नोंद घेऊन २० दिवसाचे आत या कार्यालयास कळवावे.
   - या परवानगीतील अति व शर्तीचा भंग केल्याचे आढळून आल्यास वेळो वेळी तसा अहवाल तहसीलदार **देवळी** व उपविभागीय अधिकारी **वर्धा** यांना सादर करावा.
   - **अभिन्यासातील खुल्या जागेचा जिल्हाधिकारी वर्धा यांचे पत्र क्र. अका/नझुल/कावी-835/2001 दि. 28/8/2001 अन्वये शासनाचे नावाने 7/12 वेगळा करुन तशी नोंद घ्यावी.**
5. तालुका निरिक्षक भुमि अभिलेख **देवळी** यांना माहीती करीता अग्रेषित.
6. **मुख्याधिकारी नगर परिषद पुलगावं** माहीतीकरीता अग्रेषित. त्यांना विनंती करण्यात येते की, अभिन्यासाप्रमाणे **526.95 चौ.मि.** खुली जागा व्यवस्थापनाकरीता प्रचलित नियमानुसार सार्वजनिक उपयोगाकरीता **नगरपरीषदेच्या** ताब्यात घ्यावी व तीची देखरेख करावी. सदर जागेवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही तसेच सदर जागेचा दुरुपयोग होणार नाही याची दक्षता घ्यावी.
7. **दुय्यम निबंधक ,देवळी यांना माहितीस्तव अग्रेषित.कृपया परवानगी मध्ये समाविष्ट प्रत्येक भूखंडाची विक्री करताना परवानगीचे पत्र हे विक्री पत्रासोबत जोडलेल्या दस्ताचा भाग राहील याची दक्षता घ्यावी.**
8. निवड नस्ती.
9. सदर आदेश संगणकीय स्वाक्षरीसह www.scribd.com/adcwardha या संकेत स्थळावर पाहण्यासाठी व download करण्यासाठी उपलब्ध केली आहे.

पलग
2064/2014
80/53

पलग
2399/२०२०
42199

BHAGWAT SANJAY MADHUKAR

Digitally signed by BHAGWAT SANJAY MADHUKAR
DN: cn=BHAGWAT SANJAY MADHUKAR, c=IN, st=Maharashtra, o=GOVT OF MAHARASHTRA, ou=Manufacturing,CID - 3688237
Location: Wardha
Date: 2015.09.10 19:05:54 +05'30'

अपर जिल्हाधिकारी,वर्धा

Additional Collector, WARDHA.

भूधारकाला देण्यात यावयाच्या सनदेचा नमुना

ज्याअर्थी,

तालूका	मौजा	सर्वे न.	क्षेत्र sq m
देवळी	गुंजखेडा	453	5700.00

च्या धारकाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 च्या कलम 42 च्या तरतुदी अन्वये खऱ्याखुऱ्या निवासी प्रयोजनासाठी जमिनीचा वापर प्रारंभ केल्याची सूचना दिलेली आहे आणि इतर माहिती सादर केली आहे,

आणि ज्या अर्थी,उक्त कलम 42 च्या पोट कलम (1) मध्ये विनिर्दिष्ट केलेय शर्ती लागू करण्यासम्बंधी आणि त्या शर्तीची पूर्तता करन्यासंबधी, त्याने स्वतःची खरीखुरी खात्री करून घेतलेली असल्याचे त्याने नमूद केले आहे.

आणि ज्या अर्थी वर नमूद केलेई सूचना आणि माहिती त्याच्या संपूर्ण माहिती प्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी आहे.

आणि ज्या अर्थी पडताळणी केल्या नंतर असे आढळून आले आहे कि, उक्त कलम 42 पोट कलम (1) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व शर्ती उपरोक्त जमिनीचा धारक पूर्ण करीत आहे.

त्या अर्थी,आता असे प्रमाणित करण्यात येत आहे कि, उक्त संहितेमधील, तरतुदीच्या आणि,तदअन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींना आणि खालील शर्तीना अधीन राहून उपरोक्त जमिनीच्या धारकाला हि सनद देण्यात येत आहे.

१. **आकारणी**- उक्त जमिनीचा धारक, उक्त जमिनीच्या संबधात, या अगोदर वसुली करण्यात असलेल्या आकारणी ऐवजी, शासनाला प्रत्येक वर्षी 1 औगष्ट या दिवशी, 31 जुलै रोजी संपणार हमीचा कालावधीत रुपये **5668.00** (अक्षरी रु. पाच हजार सहाशे अडुसष्ठ) एवढी वार्षिक आकारणी आणि उक्त कालावधी संपल्यानंतर उक्त संहिते अन्वये जिल्हाधिकारी यांच्या कडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल अशी, सुधारित आकारणी देईल .

२. उक्त जमिनीचा धारक शासनाला उक्त संहितेच्या कलम 47 अ नुसार रुपांतर कराची कोणतीही असल्यास रक्कम देयील .

३. उक्त जमिनीचा धारक, उक्त जमिनीवर, वसुलीयोग्य असलेले सर्व कर, दर आणि उपकर भरील .

४. उक्त जमिनीचा धारकाने पुर्वगामी शर्तीपेकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास जिल्हा अधिकाऱ्यास संहितेच्या आणि तदन्वये करण्यात आलेल्या नियमाच्या तरतुदिन्वये जी भरण्यास उपयोग कर्ता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम 329 पोट कलम (2) च्या अधींतेणे त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यावर, उक्त जमीन धारकाच्या वहीवाटीत असणे चालू ठेवता येईल.त्याची साक्ष म्हणून वर्धा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी या ठिकाणी महाराष्ट्रचे राज्यपाल यांच्या वतीने स्वाक्षरी केली आहे आणि त्याच्या पदाची मोहोर लावलेली आहे. आणि अर्जदारानि सुद्धा दिनांक _____रोजी त्यांची स्वाक्षरी केली आहे,

अर्जदाराची स्वाक्षरी:

साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या व पदनामे: अ)

ब)

जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी:

आम्ही जाहीर करतो की, जीने या सनदेवर स्वत अमुक अमुक म्हणून स्वाक्षरी केलेली आहे अ,ब ही व्यक्ति, तीच व्यक्ति आहे, आणि तिने या ठिकाणी आमच्या समक्ष तिची स्वा केलेली आहे.

साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या

दिनांक:

ठिकाण:



मौजा गुंजखेडा, ता. देवळी येथील शेत स. नं. 453 आराजी 0.57 हे. आर भुखंडावर अकृषक आकारणी करणेबाबत आदेश आज दिनांक 10 -09 -15 रोजी पारित करण्यात आलेला आहे. आदेश प्रत https://www.scribd.com/doc या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. कृपया नोंद घ्यावी.
अप्पर जिल्हाधिकारी, वर्धा

9552135294;9975229799;9422863895;8275036200;9960699456;





